शिक्षण सेवक पदी नियुक्ती झाल्याने
कार्यमुक्त करणेबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश क्रं.साप्रवि-१/आस्था-४/५३३/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

वाचा:- १. मा. आयुक्त महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे , यांचेकडील शिक्षण सेवक पदासाठी जाहिरात क्र. जा.क्र.मरापप/बापवि/२०२५/२०८८ दि. २५/०४/२०२५
२. श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांचा अर्ज दि. १०/०५/२०२५
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. आस्था-१/८४९/२०२५ दि. ३०/०५/२०२५
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नियुक्ती आदेश क्र. शिक्षण/प्राथ-१/सेवक- ७/३१९/२०२६,दि. २१/०९/२०२६
५. श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांचा अर्ज दि. २६/०९/२०२६
६. वैद्यकिय अधिकारी, प्रा. आ. केंद्र टाकळी खातगाव, ता. जि. अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्र. वशि/कार्या/३२१/२०२६, दि. २६/०९/२०२६

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये संदर्भ क्र.१ अन्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये **पवित्र** या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी** (TAIT) २०२५ या परीक्षेचे ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविण्यात आले होते.

संदर्भ क्र. २ अन्वये श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांनी शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) २०२५ परीक्षेस बसण्यास परवानगी मागितलेली होती. संदर्भ क्र. ३ अन्वये गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर यांनी श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांना **शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी** (TAIT) २०२५ या परीक्षेस बसण्यास परवानगी देण्यात आली होती.

संदर्भ क्र. ४ च्या आदेशान्वये श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लोणी काळभोर नं. २, ता. हवेली, येथे **शिक्षण सेवक** म्हणून नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ५ व ६ अन्वये श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांची शिक्षण सेवक पदी निवड झाल्याने कार्यमुक्त करणे बाबत विनंती अर्ज वैद्यकिय अधिकारी, प्रा. आ. केंद्र टाकळी खातगाव, ता.अहिल्यानगर मार्फत प्राप्त झालेला आहे.

सदर पदावर हजर होणे कामी शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/०८ दिनांक २ डिसेंबर १९९७ नुसार श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांना **आदेशाचे दिनांकास** कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करणेत येत आहे. तरी सदर आदेशाची नोंद संबंधितांच्या मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणकीय सांकेतांक क्र. 202609290401 67 असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 29-09-2026 19:26:12
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम. अपर्णा शिवाजी टकले, परिचर
द्वारा व प्रत — वैद्यकिय अधिकारी, प्रा. आ. केंद्र टाकळी खातगाव, ता. जि. अहिल्यानगर
२/- सदरचा आदेश संबंधीतास बजावुन दिनांकित स्वाक्षरीची पोहोच व श्रीम अपर्णा शिवाजी टकले, परिचर यांना कार्यमुक्त केलेल्या आदेशाची प्रत या कार्यालयास पाठवावी.
प्रत - गट विकास अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर
प्रत - निवड नस्ती

स्वाक्षरीत/-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर